**ठळक बातम्या**

- प्रीमियम पेट्रोलच्या किंमतीत लिटरमागे सव्वा २ रुपयांपर्यंतची वाढ, व्यावसायिक ग्राहकांसाठी डिझेल २२ रुपये लिटरनं महाग

- आयकरासाठीचे नवे नियम प्रसिद्ध, १ एप्रिलपासून दिवसाला ५० हजार ऐवजी वर्षाला १० लाख रुपये बँकेत रोखीनं भरले तर पॅन आवश्यक

- महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दीवर्ष सोहळ्याला प्रारंभ, तळ्याचं जल शुद्धीकरण प्रकल्प आणि परिसर सुशोभीकरणाला सुरुवात

**आणि**

- १०१व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांची एकमताने निवड

**<><><><><><>**

जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यामुळे देशात प्रीमियम पेट्रोलच्या किमतीत लिटरमागे २ ते सव्वा २ रुपयांची वाढ झाली आहे. औद्योगिक वापराच्या डिझेलच्या किमतीत २२ रुपये प्रतिलिटर वाढ करण्यात आली आहे. सर्वसाधारण पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत अद्याप कोणतीही वाढ झालेली नाही. याविषयी पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा म्हणाल्या.

**होल्ड - सुजाता शर्मा**

देशात गेल्या आठवडाभरात ११ हजार ३०० टन व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा करण्यात आल्याचं शर्मा यांनी म्हटलं आहे. एलपीजी सिलिंडरचा काळाबाजार आणि साठेबाजी विरोधात काल देशभरात साडे ४ हजार ठिकाणी छापे टाकण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

गेल्या २४ तासांत कोणत्याही सागरी दुर्घटनेची नोंद झाली नसून, देशाच्या सर्व नौका त्यावरचे  खलाशी सुरक्षित असल्याचं बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी सांगितलं.

<><><><><><>

बँक खात्यात वर्षाला १० लाख रुपये रोख जमा केले किंवा काढले तर ग्राहकांना आता पॅन क्रमांक देणं १ एप्रिलपासून बंधनकारक असेल. सध्या ही मर्यादा दिवसाला ५० हजार रुपये इतकी आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं नव्या आयकर कायद्याच्या नियमांची अधिसूचना आज राजपत्रात प्रसिद्ध केली. १ एप्रिलपासून हे नियम लागू होणार आहेत. त्यात हे बदल करण्यात आले आहेत.

कुठल्याही प्रकारचं ५ लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचं वाहन खरेदी करताना आता पॅन क्रमांक देणं बंधनकारक असेल. सध्या दुचाकी खरेदी करताना पॅन देण्याची गरज नव्हती.

हॉटेल, रेस्टॉरंटचे बिल, तसेच विविध सभागृहाचे भाडे देताना १ लाखापेक्षा अधिक रक्कम दिली तर पॅन क्रमांक देण्याची गरज असेल. सध्या ही मर्यादा ५० हजार रुपये आहे. घर, जमिनीचे व्यवहार करताना मालमत्तेचे मूल्य २० लाखापेक्षा जास्त असेल तर पॅन द्यावा लागेल. सध्या १० लाखापेक्षा अधिक रकमेचे व्यवहार करायचे असतील तर पॅन द्यावा लागतो.

अधिकाधिक शहरात राहणाऱ्या नागरिकांना नव्या आर्थिक वर्षात घरभाडे भत्त्यासाठी आयकरातून सवलत मिळेल. मुंबई, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नईतल्या करदात्यांना ५० टक्के तर इतर शहरातल्या नागरिकांना ४० टक्के सवलत मिळेल.

घरभाड्यासाठी आयकर सवलत घेताना आता घरमालक आणि भाडेकरू यांचं नातं सांगावं लागेल. नव्या नियमांमध्ये अनेक गोष्टी सुलभ करण्यात आल्या असल्याचं प्रत्यक्ष कर मंडळानं म्हटलं आहे.

<><><><><>

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळं सर्वांसाठी खुलं करण्यासाठी केलेल्या सत्याग्रहामुळे केवळ महाराष्ट्राचाच नाही तर देशाचा इतिहास बदलला. या सत्याग्रहाच्या माध्यमातून बाबासाहेबांनी देशात समतेची मुहुर्तमेढ रुजवली, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज महाड इथं केलं.

चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाला आजपासून सुरूवात झाली. यावेळी चवदार तळे जल शुद्धीकरण प्रकल्प आणि परिसर सुशोभीकरण प्रकल्पाचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले....

**होल्ड बाईट- मुख्यमंत्री**

याच कार्यक्रमात जातीय अत्याचारांमुळे मृत्यू झालेल्यांच्या वारसांना थेट शासकीय सेवेतल्या नियुक्तीपत्रांचं वितरण प्रातिनिधिक स्वरुपात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. चवदार तळ्याजवळच्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येनं जनसागर लोटला होता. बाबासाहेबांच्या पुतळ्यावर आज सकाळी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

<><><><><>

चवदार तळ्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ऐतिहासिक क्रांती करून समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश दिल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटल आहे. महाडमध्ये 'चवदार तळे सत्याग्रह समता शताब्दी वर्ष' सोहळ्याचा प्रारंभ करताना ते बोलत होते. चवदार तळ्याची क्रांती ही लोकशाही आणि संविधानासाठी अत्यंत महत्वाची घटना आहे, अशी भावना महात्मा गांधी यांचे पणतु तुषार गांधी यांनी यावेळी व्यक्त केली.

<><><><><>

१०१व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांची एकमताने निवड करण्यात आली. अखिल भारतीय

नाट्य परिषदेच्या १८ मार्च रोजी झालेल्या सभेत हा निर्णय घेण्यात आला. तसंच, १००व्या नाट्यमहोत्सवाची सांगता २४ एप्रिल ते २६ एप्रिल दरम्यान रत्नागिरी इथे होणार असल्याची माहिती प्रमुख कार्यवाहक अजित भुरे यांनी दिली आहे.

<><><><><>

सातारा जिल्हा परिषदेत प्रथमच भाजपने सत्ता स्थापन केली असून भाजपच्या डॉ. प्रिया शिंदे यांची अध्यक्षपदावर तर राजू भोसले यांची उपाध्यक्ष पदावर निवड झाली आहे. प्रिया शिंदे या कोरेगावचे शिवसेनेचे आमदार महेश शिंदे यांच्या पत्नी आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेच्या उमेदवारांवर अवघ्या तीन मतांनी विजय मिळवला.

या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या ३ तर शिवसेनेच्या २ सदस्यांनी मदत केल्याचं उघड झालं आहे. पक्षादेश झुगारून भाजपला मतदान करणाऱ्या सदस्यांवर अपात्रतेची कारवाई प्रस्तावित करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना दिली.

<><><><><>

नाशिकमधला बलात्कार प्रकरणातला आरोप अशोक खरात प्रकरणी दोषी असणाऱ्या सर्वांवर कारवाई करू, सर्व दोषींना जेरबंद करु असं आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं आहे.

याप्रकरणी खरात याच्याशी संबंधित राजकीय नेत्यांविरोधातही पक्ष कारवाई करेल असं राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी सांगितलं. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्याबाबतीत पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा करून योग्य निर्णय घेतला जाईल असं पटेल म्हणाले.

<><><><><>

मुंबईत वर्सोवा ते भाईंदर रस्ते प्रकल्पासाठी मुंबई महापालिकेला ४५ हजारांहून अधिक खारफुटीची झाडं तोडण्याची परवानगी देणाऱ्या मुंबई उच्च

न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करायला आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. या प्रस्तावित रस्त्यामुळे पश्चिम महामार्गावरची वाहतूक कोंडी कमी होईल, त्यामुळे हा निर्णय सामान्य जनतेसाठी फायदेशीर असल्याचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील पीठाने म्हटलं आहे.

**<><><><><><>**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन उद्या आणि परवा राज्याच्या दौऱ्यावर येत आहेत. उद्या ते नागपूर इथल्या महर्षी व्यास सभागृहात आयोजित 'भारतीय युवा संसदे'च्या २९ व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभाला उपस्थित राहतील. दुपारी मुंबईतल्या लोक भवनात रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभ तसंच ६४ व्या जैन दीक्षा समारंभाच्या कार्यक्रमालाही ते उपस्थित राहतील.

२२ मार्च रोजी ते पुणे जिल्ह्यात उरळी कांचन इथल्या निसर्गोपचार आश्रमाच्या स्थापना दिन कार्यक्रमाला उपस्थित राहतील.

**<><><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ३२६ अंकांची वाढ झाली आणि तो ७४ हजार ५३३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ११२ अंकांची वाढ नोंदवत २३ हजार ११४ अंकांवर बंद झाला. सकाळच्या सत्रात दोन्ही निर्देशांकात यापेक्षा अधिक तेजी होती, मात्र दुपारनंतर ती ओसरली.

**<><><><><><>**

बेकायदेशीर ऑनलाईन गेमिंगला आळा घालण्यासाठी सरकारने ३०० बेकायदेशीर जुगारी खेळांच्या संकेतस्थळांना तसेच ॲप्सना ब्लॉक केलं आहे. सट्टा आणि मटक्याचे जुगार तसंच कॅसिनो गेमिंग उपलब्ध असलेल्या इतर अनेक संकेतस्थळांवरही कारवाई करण्यात आल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान

मंत्रालयातल्या सूत्रांनी म्हटलं आहे. आतापर्यंत अशा ८ हजार ४०० संकेतस्थळांना ब्लॉक करण्यात आलं असून ऑनलाईन गेमिंग विरोधातला कायदा आल्यानंतर त्यातील बहुसंख्य संकेतस्थळांवर कारवाई करण्यात आल्याचं सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><><>**

येत्या दोन दिवसांत उत्तर महाराष्ट्र आणि कोकण वगळता राज्याच्या उर्वरित भागात पावसाची शक्यता असून, हवामान विभागानं मराठवाडा आणि विदर्भात पावसाचा येलो अलर्ट जारी केला आहे.

**परभणी** जिल्हाच्या जिंतूर तालुक्यात जोगवाडा शिवारात काल संध्याकाळी वीज कोसळून एका शेतकऱ्याचं पशुधन दगावलं.

**जालना** जिल्ह्यात काल रात्री पडलेल्या अवकाळी पावसामुळे एकूण एक हजार ३६४ हेक्टर क्षेत्रावरच्या पिकाचं नुकसान झालं. यात ६१८ बागायती, ३१० जिरायती तर ४३६ हेक्टर क्षेत्रावरच्या फळपिकांचं नुकसान झालं असून, चार जनावरं दगावली.

**धुळे** जिल्ह्यात पाऊस आणि गारपिटीमुळे साक्री, शिरपूर आणि शिंदखेडा तालुक्यातल्या काही गावांमध्ये पिकाचं मोठं नुकसान झालं.

**//<><><><><><>//**